जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.१५/०९/२०२४**
**दि.१४/०९/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ८८५/२०२४,भारतीय न्याय संहीता कलम ३०९(४),१२६(२),३५१(२),३१ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४७ वर्षे,रा.वाकड पुणे |
| **आरोपीत** | कार मधील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/०९/२०२४ रोजी रात्रौ ०१/३० वा.चे सुमारास कान्हा मेटल शॉप होलसेल भांडयाचे गोडाऊन समोर,पुणे नगर रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कार मधुन राहते घरी वाकड या ठिकाणी जात असताना गाडीचे चाक पंक्चर झाल्याने ते पंक्चर काढण्यासाठी पंक्चरचे दुकान शोधात असताना वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी एका पांढरे रंगाचे स्विप्ट कार मधुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांची स्विप्ट कार फिर्यादी यांचे गाडीला आडवी लावुन गाडीजवळ येवुन तुम्ही चालवित असलेली गाडी चोरीची असुन तुम्ही आमचेसोबत पोलीस चौकीला चला असे म्हणुन गाडीमध्ये बसुन फिर्यादी यांचे जवळ असलेला मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावुन घेवुन गाडी खराडी रोडने थेऊर मार्गे गणेश नगर खामगाव पर्यंत सोबत येवुन आजुबाजुला शेती आहे हे पाहुन रात्रौ ०२/५० वा.चे सुमारास फिर्यादी यांना गाडी थांबविण्यास सांगुन दमदाटी करुन मोकळ्या रोडवर गाडीतुन खाली उतरवुन जबरदस्तीने फिर्यादी यांची गाडी चोरुन निघुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी गोडसे मो.नं.८०८७०७७१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४५०/२०२४,भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४),३१०(५) भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५), व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),१३५, |
| **फिर्यादी** | भगवान गोपीनाथ हंबर्डे पो.अंमलदार नेमणुक हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | १)प्रणव प्रशांत शेजुळ वय १९ वर्षे,रा.बंटर शाळेच्या पाठिमागे,गाडीतळ हडपसर पुणे (अटक) दोन विधीसंघर्षग्रस्त बालक (ताब्यात) व इतर दोन पाहीजे आरोपीत |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/०९/२०२४ रोजी ०२/२० वाजताचे सुमारास रेल्वे ट्रॅकजवळ,जुना फुरसुंगी रोड, कॅनॉलच्या बाजुला मोकळया जागेत,हडपसर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची फिर्याद की, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद इसमांनी शस्त्रबंदी आदेशाचा भंग करुन आपले कब्जात दोन लोखंडी कोयते बेकायदेशीरपणे अनाधिकाराने बाळगताना मिळून आले तसेच त्यांचेकडे नायलॅान दोरी आणि मिरची पुड असे एकूण ९००/- रुपयाचा मुद्देमाल दरोडा टाकण्याचे उद्देशाने दरोडयाची तयारी करुन एकत्रित आलेले असतांना मिळुन आले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश कवळे मो.नं.९६८९९५६९९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १९६/२०२४, भा.न्या.सं.कलम १०६(१),२८१,१२५(अ),मोटार वाहन कायदा कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अक्षय डोळस वय २१ वर्ष रा.खडकी पुणे |
| **आरोपीत** | आसाराम विठ्ठल बजगुडे वय ४० वर्ष.रा.कुटेवाडी ता.जि.बीड (अटक) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०९/२०२४ रोजी रात्री २१/१५ वा.चे सुमारास के.ई.एम.हॉस्पीटल जवळील गुरुकृपा मेडीकल समोरील रोडवर सोमवार पेठ पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांची मावस बहिण चालवत असलेल्या अँक्टीव्हा गाडी वरून फिर्यादी यांचे वडील रविद्रं हरीभाऊ डोळस वय ५० वर्ष.रा.एलआयसी क्वॉर्टर्स,औंध रोड,खडकी पुणे हे मागे बसुन जात असतांना अँक्टीव्हा गाडीस पाठीमागुन धडक देवुन मावस बहिणीस दुखापत करुन फिर्यादी यांचे वडील यांना गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.प्रेरणा कुलकर्णी मो.नं.९०८२५३३०९६ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३०३/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),३(५) सह आयटी ॲक्ट ६६ (डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २७ वर्ष रा.धानोरी पुणे |
| **आरोपीत** | इन्स्टाग्राम ॲप्लीकेशन धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०७/२४ ते दि.२८/०८/२४ रोजी राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील नमुद इसमानी इंन्टाग्राम वर ॲप्लीकेशनद्वारे लिंक पाठवुन शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक करण्यास सांगितले. प्रथम काही प्रमाणात नफा देवुन विश्वास संपादन करुन त्यानंतर फिर्यादी यांना विविध कारणाने गुंतवणुक करण्यास भाग पाडुन व कोणताही मुळ परतावा रक्कम न देता फिर्यादी यांची २६,००,०००/-रु.ची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे)शंकर साळुंखे मो.नं.८८८८८१३१५४ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १५३/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३१९(२),३१८(४),३(५) सह माहिती तंत्रज्ञान कायदा ६६ (डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४४ वर्ष रा.एरंडवणे,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०५/२०२४ ते दिनांक ०५/०८/२०२४ रोजी राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे निवास्थानी असताना यातील मोबाईल धारक यांनी शेअर ट्रेडींगचे मोठया प्रमाणात प्रलोभन दाखविले त्याच प्रमाणे सुरवातीस काही प्रमाणात नफा देवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. त्या नंतर फिर्यादी जेव्हा पैसे withdraw करण्याचा प्रयत्न केला असता या ना त्या कारणाने रक्कम देण्याचे टाळले आणि फिर्यादी यांची एकुण ३०,६०,४७६/-रुपये इतक्या रक्कमेची फसवणूक केली आहे |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे) सुरेखा चव्हाण मो.नं.९६५७१५८७५० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३०१/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३१९(२),३१८(४), ३(५)सह आयटी ॲक्ट ६६ (डी) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३९ वर्ष रा.टिंगरेनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०८/२४ रोजी ते दि.३०/०८/२४ रोजी राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यानी टास्क पूर्ण केल्यावर जास्त परतावा मिळतो याचे प्रलोभन देवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांनी विश्वास ठेवून पैशाचा भरणा करत गेले व ज्यावेळी फिर्यादी यांनी withdrawal करण्याचा प्रयत्न केला त्यांवेळी त्यांना रक्कम देण्याचे टाळुन फिर्यादी यांची एकुण ११,२७,४८०/-रुपये रक्कमेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे)शंकर साळुंखे मो.नं.८८८८८१३१५४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**